# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय**

**रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र.- ३८** दिनांक २६/०२/२०२१

## भाईंदर पुर्व येथील हॉटेल मिड लाईफ ऑर्केस्ट्रा बारवर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ यांची कारवाई

दिनांक २५/०२/२०२१ रोजी रात्री भाईंदर पुर्व रेल्वे स्टेशनसमोरील हॉटेल मिड लाईफ ऑर्केस्ट्रा बारमध्ये सिंगर मुलींकडुन नृत्य व अश्लील नृत्य करवुन घेत असुन तसे करण्यास बारचे व्यवस्थापन हे प्रोत्साहन देत असल्याबाबत माहिती अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ मिरारोड यांना मिळाली वरुन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांच्या पथकाने मिडलाईफ ऑर्केस्ट्रा बारमध्ये गाण्याच्या तालावर अश्लिल नृत्य होत असल्याची मोबाईलमध्ये शुटींग प्राप्त करुन मिळालेल्या बातमीची खात्री करुन छापा घातला सदर बारमधील मेकअपरुमच्या काचेच्या आरशांच्या संरचनेत बदल करुन काचेच्या आरशाचा दरवाजा बनवून त्याच्या पाठीमागे अरुंद जागेमध्ये सिमेंट भितींच्या संरचनेत बदल छुपी खोली (कॅव्हीटी) बनविली असल्याचे दिसुन आले. सदर खोलीत वायुविजनासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने छुप्या खोलीत लपविलेल्या मुलींच्या जिवीतास धोका पोहचण्याची शक्यता गृहीत धरुन मिरा-भाईंदर म.न.पा. अग्निशमन दलाला पाचारण करुन दरवाजा उघडला असता आतमध्ये ७ X ४.५ फुट लांबी-रुंदीच्या छुप्या खोली (कॅव्हीटी) मध्ये दाटीवाटीने ६ महिलांना लपवीले असल्याचे दिसुन आल्याने तेथून त्या ६ महिलांची सुटका केली. हॉटेल मिड लाईफ ऑर्केस्ट्रा बारमधील सिंगर मुलींकडुन नृत्य व अश्लील नृत्य करवुन घेवुन, त्यांचे जिवाची पर्वा न करता त्यांचे जीवीतास धोका होईल असे कॅवीटी मध्ये ठेवुन प्रोत्साहन देणारे बारचे १० स्टुअर्ड/वेटर व व्यवस्थापन व ११ गिऱ्हाईकांविरुद्ध नवघर पोलीस ठाणे मध्ये गुरनं. १३१/२०२१ भादंवि कलम ३०८, ३४ सह महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणाऱ्या) महिलेंच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ च्या कलम ३, ८ (१) (२) सह कलम ३३(डब्ल्यु) १३१ महाराष्ट्र पोलीस कायदा सह महाराष्ट्र कोवीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ब साथ रोग अधीनियम २, ३, ४ प्रमाणे गुन्हा नोंद करुन कारवाई केली आहे.

सदरची कारवाई श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१ मिरारोड, सपोनि/दत्तुसाहेब लोंढे, सफौ. विनायक मगर, पोहवा. अजय मांडोळे पोकॉ. जितेंद्र उथळे, पोकॉ. विनोद चव्हाण, मपोना.विजेता नाईक यांनी केली आहे.

-------ooo------